२५/०९

कर्मचारीवर्ग खाते :
परिपत्रक क्र. ५ /१९९४.

क्र. राप/आस्था/४८६-ई/ ८८५
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०० ००८. दिनांक :- १५.२.१९९४.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा. प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.

व्यवस्थापक [प्रशिक्षण], रा. प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,
भोसरी, पुणे.

मुख्य सल्लागार संस्थांतर्गत
व्यवस्थापन सल्ला गट, रा. प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक,
रा. प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई / मुंबई/धुळे/जळगाव/नाशिक/पालघर/रायगड[पेण]/
रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/पुणे/अहमदनगर/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/
बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/अकोला/अमरावती/भंडारा/
बुलढाणा/चंद्रपूर/वर्धा/यवतमाळ.

कार्यकारी अभियंता, रा. प. औरंगाबाद/धुळे/कोल्हापूर/नागपूर/पुणे/परभणी/ठाणे/अकोला/
बारामती.

विषय : अनुकंपा तत्वावर रा. प. कर्मचा-यांच्या एका
अवलंबितास नेमणूक देण्याबाबत.

---

वरील विषयावर दिनांक १७.१.९४ व १८.१.१९९४ रोजी झालेल्या महामंडळाच्या सभेमध्ये विचार करण्यात आला. महामंडळ ठराव क्रमांक ९३.०८.०२ दि. ११/१२.८.१९९३ अन्वये वरील विषयी जो ठराव करण्यात आला होता त्या ठरावाच्या अनुषंगाने अनुकंपा तत्वावर नेमणुका देण्याबाबत येणा-या अडचणींबाबत वरील सभेमध्ये विचार करण्यात आला. सर्व बाजुंचा सांगोपांग विचार करुन वरील सभेमध्ये महामंडळाने केलेल्या ठराव क्र.९४.०१.०७ दि. १७/१८ जानेवारी, १९९४ अन्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१] कर्मचा-यांच्या अवलंबितांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याविषयी यापूर्वी प्रसृत करण्यात आलेली सर्व परिपत्रके/प्रशासकीय आदेश रद्द करुन त्याऐवजी सदरचे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

२] अनुकंपा तत्वावर नोकरी मिळविण्यासाठी सर्व वर्गातील कर्मचा-यांच्या अवलंबितांना अर्ज करता येतील.

३] अनुकंपा तत्वावर नोकरी मिळविण्यासाठी खालील उमेदवार पात्र असतील.

[अ] प्रत्यक्ष कर्तव्य बजावीत असतांना मृत्यु.

कर्मचारी त्याचे नियोजित कर्तव्य बजावीत असतांना [while on active duty] मृत्यू पावल्यास त्याच्या कुटुंबातील एक व्यक्ती अर्ज करण्यास पात्र राहील. जर एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास कोणास नोकरी द्यावी याबाबत महामंडळ निर्णय देईल.

[१] वरील ३-अ अंतर्गत मोडणा-या मृत कर्मचा-याच्या अवलंबितास नोकरी देतांना संबंधित मृत कर्मचा-याचा [illegible] अर्जाचा असला पाहिजे हे बंधनकारक राहणार नाही.

आवक क्रमांक १५०
दिनांक १/३/९४
सही

...२